# बांधकाम क्षेत्रात नोकऱ्यांची नव्हे, कौशल्यांची नितांत कमतरता

**Not Jobs, Skills Crisis in the Construction Sector**


विकास पाटील
वरिष्ठ नियोजन व्यवस्थापक
गलफार, ओमान

समीर आलोणे
मुख्य कार्यकारी अधिकारी
इंफिनी इंस्टिट्युट, पुणे


आज बांधकाम क्षेत्राचे जागतिकीकरण झालेले आहे. जागतिकीकरणामुळे बांधकाम क्षेत्रात परिवर्तनाची लाट आली आहे. कामाचे स्वरूप बदललेले आहे. काही गुंठयांमधील बांधकामे आज कित्येक एकर्स आणि हेक्टर्स मध्ये पसरली आहेत. ८-१० मजली इमारतींची जागा ८० ते १०० मजली गगनचुंबी इमारती घेत आहेत. Real Estate व Commercial प्रकल्पांबरोबर Infrastructure प्रकल्पांमध्ये आमुलाग्र बदल घडताना दिसतात. गतिमान व सुरक्षित बांधकाम - 'Speedy & Safe Construction' हा परवलीचा शब्द बनला आहे. वेळ (Time), किंमत (Cost) व गुणवत्ता (Quality) ही त्रिसुत्री आज सर्व कंपन्यांच्या प्रकल्प धोरणांचा हिस्सा बनली आहे. प्रकल्पांची उद्दीष्टये पूर्ण करण्यासाठी अत्याधुनिक यंत्रसामुग्रीचा, नाविन्यपूर्ण तंत्रज्ञानाचा व स्मार्ट बांधकाम साहित्यांचा वापर वाढत चालला आहे. प्रकल्प निविदा मिळवण्यासाठी जगभर प्रचंड मोठी चढाओढ सुरू आहे. १२ व्या पंचवार्षिक योजनेत भारतीय चलनव्यवस्था गतिमान करण्यासाठी पायाभूत सुविधांवर ५६ लाख करोड रूपयांची गुंतवणूक अपेक्षित आहे.

बांधकाम क्षेत्रात आज नोकऱ्यांची अजिबात कमतरता नाही. रस्ते, रेल्वे, विमान वाहतूक, जल वाहतूक इत्यादी बरोबरच इतर पायाभूत सुविधा देणारे कित्येक प्रकल्प फक्त भारतातच नव्हे तर संपूर्ण जगभर येवू घातले आहेत. कमतरता आहे ती हे प्रकल्प यशस्वीरित्या पूर्ण करण्यासाठी लागणाऱ्या कुशल मनुष्यबळाची, निपुण अभियंत्यांची, प्रोजेक्ट मॅनेजर्सची! वाढत्या स्पर्धेमध्ये आज कमीत कमी वेळेत गुणवत्तापूर्ण दर्जेदार बांधकाम कमी खर्चात करण्याचे आव्हान बांधकाम क्षेत्रापुढे आहे. हे आव्हान पेलण्यसाठी गरज आहे ती योग्य व कुशल मनुष्यबळाची! कारागिरांपासून ते प्रोजेक्ट मॅनेजर्सपर्यंत सर्वच स्तरांवर अशा कुशल अधिकाऱ्यांची नितांत गरज सर्वच कंपन्यांना आहे.

आवश्यक कुशलता ही पदानुरूप भिन्न भिन्न असते. Junior Engineer (कनिष्ठ अभियंता) ते प्रकल्प व्यवस्थापक Project Manager व पुढे C.E.O. (मुख्य कार्यकारी अधिकारी) पर्यंत वेगवेगळ्या पदांवर काम करणाऱ्या अधिकाऱ्यांच्या जबाबदाऱ्या वेगवेगळ्या असतात. ही सर्व पदे ३ मुळ प्रकारात विभागली गेली आहेत, ज्यांना व्यवस्थापकीय स्तर (Management Levels) म्हणतात: कनिष्ठ (Lower) मध्यम (Middle) व वरिष्ठ (Top).

| | |
|---|---|
| 1) Managing Director<br>2) C.E.O.<br>3) Vice President<br>4) Asst. Vice President | TLM (Top) |
| 5) Sr. General Manager<br>6) General Manager<br>7) Deputy General Manager<br>8) Sr. Manager<br>9) Manager<br>10) DeputyManager | MLM (Middle) |
| 11) Senior Engineer<br>12) Project Engineer<br>13) Jr. Engineer<br>14) Trainee Engineer | LLM (Lower) |


**व्यवस्थापकीय स्तर**

अभियंत्याच्या कारकिर्दीची सुरूवात सर्वात खालील स्तरावरून-ज्युनिअर इंजिनिअर अथवा ट्रेनी इंजिनिअर म्हणून होते. २ ते ३ वर्षे ह्या पदावर काम केल्यावर तो प्रोजेक्ट इंजिनिअर व नंतर सिनीअर इंजिनिअर बनतो. ही सर्व फळी प्रामुख्याने Lower Level Management मध्ये मोडते. ह्यांचे मुख्य काम असते प्रकल्पाची कार्यवाही (Project Execution) करणे. प्रत्यक्ष काम करण्याचे व कारागीर व कामगार वर्गाकडून कामे करून घ्यायचे कौशल्य त्यांकडे असावे लागते. वरील अधिकाऱ्यांकडून आलेल्या आदेशांची अंमलबजावणी करण्यासाठी त्यांना तांत्रिक शिक्षण/कौशल्यांची (Technical Skills) अधिकाधिक गरज असते. त्यांच्या जोडीला काही व्यवस्थापकीय कौशल्येसुद्धा (Managerial Skills) त्यांच्याकडे असावी लागतात.

त्यावरील दुसरा स्तर म्हणजे मध्यम (Middle), ज्यामध्ये Assistant Manager, Manager, Sr. Manager, Deputy Manager व General Manager ह्या पदांचा समावेश असतो. ही पदे कंपनीनुसार बदलू शकतात. ह्या पदांवरील अधिकारी हे वरिष्ठ व कनिष्ठ व्यवस्थापनामधील दुवा असतात.

बांधकाम क्षेत्रामध्ये Project Manager (PM) ला अनन्यसाधारण महत्व आहे. असे म्हणतात की एखादा प्रकल्प यशस्वी अथवा अयशस्वी करणे हे PM च्या हाती असते. ही 'Key Post' म्हणून संबोधली जाते. आपल्या कौशल्याने एखादा प्रकल्प तडीस नेण्याची क्षमता त्याकडे असावी लागते. ह्या स्तरावरील अधिकाऱ्यांकडे Execution पेक्षा Management चे कौशल्य अधिक असावे लागते. ज्यामध्ये प्रामुख्याने प्रशासन (Admin.) व मानवी संसाधन (H.R.) हे विषय येतात. काम प्रत्यक्ष करण्यापेक्षा ते आपल्या टीमकडून करून घेणे ह्यात खरी कसोटी असते. तांत्रिक, व्यवस्थापकीय, प्रशासकीय बरोबरच थोडे संकल्पनात्मक (Conceptual) व विश्लेषनात्मक (Analytical) कौशल्यांची गरज ह्या पदांची जबाबदारी यशस्वीरित्या पार पाडण्याकरिता असावी लागते. झटपट निर्णय घेणे, परिस्थितीचा आढावा घेणे, मार्गदर्शन करणे, सांघिक नेतृत्व करणे इ. विविध गुण त्यांकडे असावे लागतात.

ह्यावरील स्तर म्हणजे वरिष्ठ व्यवस्थापकीय स्तर (Top Level Management) ह्यामध्ये प्रामुख्याने Assistant Vice President, Vice President, Board of Directors, CEO व Managing Director ही पदे असतात. ह्या पदांवर काम करणाऱ्या अधिकाऱ्यांनी कंपनीला योग्य दिशा देणे, निर्णय घेणे, व्यवसाय वृद्धींगत करणे इत्यादी जबाबदाऱ्या पार पाडणे अपेक्षित असते. त्याचबरोबर कंपनी कार्यरत रहाण्यासाठी नियमावली बनविणे (Policy Making) व त्यासंबधींचे निर्णय घेणे हेही महत्वाचे असते. ह्यासाठी त्यांकडे प्रामुख्याने संकल्पनात्मक व विश्लेषनात्मक कौशल्ये अधिक असावी लागतात.




कौशल्यांच्या गरजांची व त्यातील फरकांची जाणिव तसेच त्यांची सखोल माहिति प्रत्येकाला असणे गरजेचे आहे. ह्या पदांवर काम करणाऱ्या अधिकाऱ्यांत जर विविध कौशल्यांची योग्य सांगड नसल्यास कामातील नैपुण्य व कार्यक्षमता (Efficiency) यावर विपरित परिणाम होतो. ह्यामुळेच अकार्यक्षमता वाढीस लागते. जेवढी अधिक विसंगती, तेवढी कमी उत्पादन क्षमता ! (शिक्षण) + (कामाचा अनुभव) + (कौशल्ये) ह्यांची सांगड असल्यासच तो अधिकारी लायक (Competant) ठरू शकतो.

असे म्हणतात की, 'Leaders are born, Managers are made'. व्यवस्थापक हा फक्त अनुभव व ज्ञान (शिक्षण) ह्याच्या जोरावर कुशल बनू शकत नाही. एका अभियंत्याला जर निपुण व्यवस्थापक व्हायचे असेल तर त्याने अनुभवाबरोबर विविध कौशल्यांची जोपासना करणे गरजेचे असते. कुशल व्यवस्थापक हा एक उत्तम नेता (Leader) व द्रष्टा (Visionary) असावा लागतो, जो आपल्या प्रोजेक्ट टिमला एकत्र बांधून ठेवून योग्य दिशा देणारा व त्यांचे नेतृत्व करणारा असावा लागतो. त्याकडे मानवी संसाधनाचे व प्रशिक्षण (Training) देण्याचे कौशल्य असावे लागते, जे माणसे जोडण्यास, सांघिक ऐक्य जोपासण्यास व त्यांच्याकडून कामे करून घेण्यास उपयोगी ठरते. त्यास विविध प्रकल्प भागधारकांसोबत (Project Stakeholders) सुसंवाद साधणे, तडजोड करणे, इ. ची कला अवगत असावी लागते. ह्याचबरोबर प्रकल्पाचे नियोजन (Planning), निधी व वेळेचे व्यवस्थापन, कामाचे व जबाबदाऱ्यांचे व अधिकारांचे वाटप इ. महत्वाची कामे पार पाडावी लागतात. कामाचा ताण कमी करणे (Stress Mangement) सहनशिलता(Patience), निर्णयक्षमता, कामावरील निष्ठा इ. गुण सुद्धा त्याकडे असावे लागतात. तो एक उत्तम वक्ता व त्याहून महत्वाचे, उत्तम श्रोत्रा असावा लागतो. तो हलक्या कानाचा असेल तर योग्य निर्णय घेण्यास अपात्र ठरतो. एखादी गोष्ट नियोजनानुसार घडली नाही तर परिस्थितीचे विश्लेषण करून, त्यातील अडचणी, संभाव्य धोके (Risks) ओळखून त्वरीत दुसरा पर्याय शोधून, त्याची अंमलबजावणी करण्याचे सामर्थ्य त्याकडे असावे लागते.

त्यास कठीण व अनुचित परिस्थितीत शांत डोक्याने, सारासार विचार करून, विवेकाने निर्णय घेण्याची कला अवगत असणे गरजेचे असते. आपल्या सहकाऱ्यांशी तसेच वरिष्ठ व कनिष्ठ अधिकाऱ्यांशी कसे वागावे व त्यांच्याकडून कशी कामे करून घ्यावीत ह्याचे नैपुण्य त्यास मिळवावे लागते. ज्याचे त्याने विविध अनुभवातून हे गुण व ह्या कला अवगत कराव्या लागतात. ह्या सर्वांबरोबरच त्याने स्वतःची मुल्ये (Values), नैतिकता (Morals), कार्यसंहिता (Work Ethics) आणि जीवन जगण्याची तत्वे (Principles) ठरवावी व जाणीवपूर्वक जोपासावी लागतात. कामाबद्दल प्रेम (Love), आवड (Passion), जिद्द, धैर्य (Courage), एकजूट (Integrity), विश्वास (Trust), गुणवत्ता (Quality), व्यवसायिकता (Professionalism) व इतर अनेक मुल्ये आत्मसात करणे व त्यावर ठाम रहाणे ही एका कुशल, निपुण व सफल व्यवस्थापकाची ओळख असते. ह्या सर्वांबरोबर जोपासावी लागते ती योग्य वृत्ती (Attitude)!

(Education) + (Experience) + (Skills) + (Attitude) = Successful Career

असे म्हटले जाते की, 'Not aptitude but attitude determines altitude'. ह्याच वृत्तीची व कौशल्य असलेल्या मनुष्यबळाची आज बांधकाम क्षेत्रात वाणवा आहे. सुशिक्षित व अनुभवी पण अकुशल अभियंत्याची उपलब्धता खूप आहे. गरज आहे ती त्यांना आवश्यक कौशल्ये, गुण, निपुणता, मुल्ये व तत्वे यांचे प्रशिक्षण देण्याची! ही गरज ओळखून इंफिनी इंस्टिट्युट ऑफ प्रोग्रॅम मॅनेजमेंट (Infini I. P. M.) ह्या संस्थेने पुढाकार घेतला आहे. पुण्यातील ही संस्था स्थापत्य अभियंत्यांना योग्य मार्गदर्शन करून त्यांची कारकिर्द (Career) घडविण्यासाठी प्रयत्नशील आहे. इंफिनीतर्फे विनाशुल्क परिसंवाद आयोजित केले जातात. "Career Guidance" च्या ह्या परिसंवादात तज्ज्ञांचे मार्गदर्शन उपलब्ध करून दिले जाते. बांधकाम क्षेत्रातील सफल झालेल्या व्यावसायिकांना, तज्ज्ञ व अनुभवी मंडळींना तसेच अधिकाऱ्यांना भेटायची संधी उपलब्ध करून दिली जाते. असे परिसंवाद ह्या आधी झाले असून इथून पुढे सुद्धा दर महिन्याच्या पहिल्या रविवारी सकाळी १० ते १२ ह्या वेळेत संस्थेच्या कार्यालयात आयोजित केले जाणार आहेत. अधिकाधिक अभियंत्यांनी ह्या संधीचा फायदा घ्यावा. ह्यासंबंधीची अधिक माहिती कंपनीच्या www.infinisolutions.in ह्या वेबसाईटवर उपलब्ध आहे.